एमएचएलए१३०००७२६२०२०

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | २८.०८.२०२० | |
| नोंदणी तारीख | २८.०८.२०२० | |
| निकाल तारीख | १६.०६.२०२६ | |
| कालावधी | वर्षे महिने दिवस | |
| | ०५ १० १९ | |
| निशाणी | <u>४७</u> | |

**रेणापुर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**
**ता. रेणापुर, जिल्हा- लातुर.**
(पिठासन अधिकारी - डी.एम. गित्ते)

**नियमीत फौजदारी खटला क्रं.५२/२०२०**

गुन्हा नोंद क्र.४१८/२०२०

फिर्यादी/तक्रारदार — महाराष्ट्र शासन तर्फे
पोलीस निरीक्षक,
रेणापुर पोलीस स्टेशन,
ता. रेणापुर, जि. लातुर.

अभियोग पक्षातर्फे — सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री.व्ही.सी.मुरळीकर.

आरोपी — **१. ग्यानदेव सोपान पुंडकरे,**
वय:– ४४ वर्षे, धंदा:– शेती,
**२. प्रविण ग्यानदेव पुंडकरे,**
वय:– २० वर्षे, धंदा:– शेती,
सर्व रा.कुंभारवाडी, ता. रेणापूर, जि.लातूर.

आरोपींतर्फे विधीज्ञ — श्री. पी.व्हाय.जाधव.

**भाग — ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २३.०६.२०२० |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २६.०६.२०२० |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | २८.०८.२०२० |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :- | ०१.०४.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | १६.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | नाही. |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १६.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अतिंम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्यानदेव सोपान पुंडकरे | नाही | १७.०१.२०२२ | भा.दं.संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे | निर्दोष मुक्त | नाही | |
| २. | प्रविण ग्यानदेव पुंडकरे | | | | | | |

**भाग – क**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)**

सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार

अ. अभियोगपक्ष –

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | नागनाथ विश्वनाथ पुंडकरे | फिर्यादी | ३९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | विश्वनाथ निवृत्ती पुंडकरे | जखमी साक्षीदार | ४१ |

ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

क. न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

**अभीयोगपक्षातर्फे, आरोपीतर्फे, न्यायालयातर्फे देण्यात आलेल्या निशाणी**

अ. अभीयोगपक्षातर्फे

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी १ | दोषारोपपत्र |
| २. | निशाणी ४०/अ.सा.क्र. १ | फिर्यादीची सही |

ब. आरोपीतर्फे

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ३. | ४२ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | ४३ व ४४ | वैद्यकिय प्रमाणपत्र |

क. न्यायालयातर्फे

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

ड. मुदेमाल

| अ.क्र. | आर्टिकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**न्यायनिर्णय**

**(घोषणा तारीख १६ जुलै २०२६)**

प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भा.दं.संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ या अपराधासाठी चालविण्यात आला.

०२. अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणेः-

फिर्यादी नागनाथ पुंडकरे हे दिनांक २३.१६.२०२० रोजी त्यांच्या वडीलांच्या नावे असलेली जमीन गट क्र. १३३ मध्ये सकाळी १० वाजेच्या सुमारास गेले होते. त्यावेळी फिर्यादीचे वडील दुस-या शेतात होते सदर ठिकाणी फिर्यादीच्या वडीलांच्या नावे गट क्र. १३३ असुन ताबा १३४ जमीनीवर आहे. फिर्यादीचा चुलत चुलता ग्यानदेव व त्याचा मुलगा प्रविण हे दोघे त्याच्या जवळ आले. फिर्यादीने सामाईक बांधावरील त्याच्या बाजुस असलेली नालीवर आरोपींनी दगड टाकुन बुजवली होती. त्यामुळे त्याचे पाणी फिर्यादीच्या शेतात येत होते. फिर्यादी सदर नालीचे दगड खाली बसुन काढत असतांना ते दोघे त्याच्या जवळ आले. त्यावेळी त्यांनी फिर्यादीला तु आमचा १३३ चा फेर का आडवलास या करणावरुन शिवीगाळ व मोठयामोठयाने आरडाओरड केली. फिर्यादीला ग्यानदेव यांनी त्यांच्या जवळ असलेली लोखंडी रॉडने डोक्यात तिन ठिकाणी मारुन डोके फोडले. त्यामुळे फिर्यादी बेशुदध पडले. फिर्यादीला मारहाण करीत असतांना व भांडणाचा आवाज ऐकुन त्याचे वडील तेथे आले. फिर्यादी जखमी व बेशुदध पडल्याने फिर्यादीला ते उठवीत होते. तेव्हा प्रविण याने फिर्यादीच्या वडीलांना काठीने डोक्यात मारले व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. इतर लोकांनी त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन जखमी केले. सदरचे भांडण हे अमर व महादु यांनी सोडवीले होते. फिर्यादी व त्याचे वडील जखमी असल्याने त्यांना मोटारसायकलवर घेउन पोलीस स्टेशनला नेले व पोलीसांनी त्यांना उपचारासाठी सरकारी दवाखाण्यात पाठवीले. त्यामुळे फिर्यादीने

आरोपींविरुद्ध फिर्याद दिली होती.

०३. सदर तक्रारीच्या अनुशंगाने गुन्हा रजिस्टर नंबर ४१८/२०२०, भा.दं.संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये नोंदविण्यात आला. गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी हजर झाल्यानंतर त्यांच्याविरुद्ध दोषारोप नोंदविण्यात आला. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे निवेदन देऊन न्यायालयीन चौकशीची मागणी केली. सरकारी वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द आलेल्या पुराव्यावरुन आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदवीण्यात आले. आरोपींनी त्यांच्याविरुद्ध खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

०४. अभिलेख, पुरावे पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगनमत करुन इच्छापुर्वक फिर्यादी व साक्षीदाराला रॉड व काठी या घातक हत्याराने मारहाण करुन किरकोळ दुखापत केली ? | .. नकारार्थी. |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगनमत करुन इच्छापुर्वक फिर्यादी व साक्षीदाराला लाथाबुक्यांनी मारहाण करुन किरकोळ जखमी केले ? | .. नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला शांतता भंग करण्याच्या उददेशाने शिवीगाळ करुन अपमानित केले ? | .. नकारार्थी. |

४. अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे काय, आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा गुन्हा केला ? .. नकारार्थी.

५. काय आदेश ? अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

०५. अभियोगपक्षाने आरोपींविरुद्ध गुन्हा शाबीत करण्यासाठी फिर्यादी नागनाथ पुंडकरे (नि.क्र.३९ अ.सा.क्र.१), साक्षीदार विश्वनाथ पुंडकरे (नि.क्र.४१ अ.सा.क्र.२) यांना तपासले आहे. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द संशयापलीकडे गुन्हा शाबीत केला असा युक्तीवाद केला. याउलट आरोपींतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अभीयोगपक्षाने संशयापलीकडे गुन्हा शाबीत केला नाही असा युक्तीवाद केला.

**मुद्दा क्रमांक १ ते ५ करिता :–**

०६. सर्व मुद्दे हे परस्पर संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन एकत्रात केलेले आहे. सदर प्रकरणात साक्षीदार फिर्यादी नागनाथ पुंडकरे (अ.सा.क्र.१) यांना तपासले. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना पाच ते सहा वर्षापुर्वी घडली होती व त्यांच्यामध्ये आणी आरोपींमध्ये किरकोळ वाद झाले होते. तसेच, अभियोगपक्षाने साक्षीदार विश्वनाथ पुंडकरे (अ.सा.क्र.२) यांना तपासले. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना चार ते पाच वर्षापुर्वी घडली होती आणी त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये बाचाबाची झाली होती. उलटतपासात सदर साक्षीदारांनी त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये भांडण मिटल्याचे कबुल केले आहे.

०७. सदर साक्षीदारांनी अभीयोगपक्षाला सहाय केले नाही. त्यामुळे अभीयोगपक्षाने त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारले. परंतु पटलावर कोणताही पुरावा

आरोपींविरुदध आला नाही. एकंदरीत साक्षीदाराच्या पुराव्यावरुन व अभिलेखावर दाखल पुरसीस वरुन आरोपींमध्ये व साक्षीदारांमध्ये तडजोड झाल्याचे दिसुन येते. आरोपींनी घटनास्थळ पंचनामा व वैदयकिय प्रमाणपत्र हे दस्त मान्य केले आहेत. परंतु साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपींनी संगणमत करुन रॉड व काठी या घातक हत्याराने, तसेच लाथाबुक्क्यांनी फिर्यादीला व साक्षीदाराला इच्छापुर्वक मारहाण करुन किरकोळ जखमी केले हे तथ्य संशयापलीकडे शाबीत होत नाही.

०८. तसेच, साक्षीदारांच्या पुराव्यात आरोपींनी त्यांना काय शिवीगाळ केली व कोणती जिवे मारण्याची धमकी दिली हे सांगीतले नाही. त्यामुळे आरोपींनी साक्षीदारांना शिवीगाळ करुन अपमानीत केले व जिवे मारण्याची धमकी देउन धाकदपटशा गुन्हा केला हे संशयापलीकडे शाबीत होत नाही. आज रोजी फिर्यादी व आरोपींमधील वाद मिटला आहे. तसेच साक्षीदार खोटी साक्ष देत आहे याबाबत कोणताही पुरावा पटलावर आला नाही. त्यामुळे साक्षीदारांविरुध्द कोणतीही कार्यवाही करणे उचीत होणार नाही. त्यामुळे मी मुद्या क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविला असून मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. आरोपींची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) नुसार भा.दं.संहिता कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपांमधुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुददेमाल एक काठी व एक रॉड मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४ आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७अ अन्वये प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- च्या जामिनावर सोडण्यात येते. अपील कालावधीनंतर आरोपींचे जामिन आपोआप रद्द होतील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2026.07.16 18:04:51 +0530

दिनांक- १६.०७.२०२६.

(डी.एम. गित्ते)
१ले न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
रेणापुर.